।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | गुरूवार दि ३० जुलै २०२६ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३१ वा

वाहून जाणारे पाणी सांगोला तालुक्यासाठी द्या शहाजीबापूंची जलसंपदा मंत्र्याकडे मागणी

शहाजीबापूंच्या मागणीवर राधाकृष्ण विखे पाटील यांची सकारात्मक भूमिका

सांगोला : महाराष्ट्रातील इतर भागात पावसाने कहर केला असला तरी सांगोला तालुक्यातील नद्या, नाले कोरडेच असून सध्या दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुरातून वाहून जाणाऱ्या पाण्यातून सांगोला तालुक्यातील माण, कोरडा नदीवरील सर्व बंधारे व तलाव भरून द्यावेत अशाप्रकारची मागणी मा. आमदार शहाजीबापू पाटील यांनी मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब, मंत्री, जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली असता त्यांनी सकारात्मक भूमिका घेत कृष्ण खोरे कार्यकारी संचालक धुमाळ व मुख्य अभियंता चोपडे यांना आदेश देऊन तातडीने पाणी सोडण्याचे आदेश दिल्याचे मा. आमदार शहाजी बापू पाटील यांनी सांगितले.

राज्यामध्ये सर्व दूर पाऊस झाला असला तरी सांगोला तालुक्यात पावसाचा थेंब नाही. परिणामी तालुक्यातील मान कोरडा नद्या व साठवण तलाव कोरडे पडले आहेत. याशिवाय भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्याने विहिरी, कुपनलिका कोरड्या पडल्या आहेत. अश्या परिस्थितीत जलसंपदा मंत्री माना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे वाहून जाणारे पाणी सांगोला तालुक्यासाठी मिळावे अशी मागणी केली असता त्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देऊन पाणी सोडण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यां वरील संकट टाळणार अशी अपेक्षा आहे,असे ॲड शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

राज्यामध्ये काही भागामध्ये मुसळधार पाऊस झाला असला तरी सांगोल्या तालुक्यामध्ये मात्र पावसाचा थेंब नाही. सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थिती मुळे सांगोला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत कृष्णा खोरे कार्यकारी संचालक धुमाळ व मुख्या अभियंता चोपडे यांना मा शहाजीबापू पाटील यांनी तालुक्यातील शेतकरी अडचणीत आला असून पावसाच्या विश्वासावर पेरणी केलेली पिके करपू लागली आहेत. याशिवाय तालुक्यातील नद्या नाले तलाव कोरडे पडले असून भूगर्भातील पाण्याचा साठा संपला असल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे पुरातून वाहून जाणाऱ्या पाण्यातून टेंभू योजनेतून माण नदीवरील सर्व बंधारे, बुद्धेहाळ तलाव व चिंचोली तलाव तसेच इतर सर्व पाझर तलाव व म्हैसाळ योजनेतून कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून द्यावेत. सदरचे पाणी तालुक्याला मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन माजी आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांची भेट घेऊन दिले. यावर केलेल्या मागणीची तात्काळ पूर्तता करण्याचे आदेश दिले असल्याचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी सांगितले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेटटी उपस्थित होते.

सांगोला तालुक्याला तत्काळ पुराचे अतिरिक्त पाणी सोडा पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे कार्यकारी संचालकांना आदेश

सांगोल्याच्या पाण्यासाठी दिपकआबांचा पाठपुरावा

सांगोला : एकीकडे राज्यात प्रचंड पाऊस होत असल्याने कृष्णा कोयना पंचगंगा नीरा अशा अनेक नद्यांना महापूर आला आहे. तर दुसरीकडे सांगोला तालुक्यातील शेतकरी आणि पशुपालक पाणीटंचाईने त्रस्त झाले आहेत. पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी टेंभू योजना, म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालव्यातून दुष्काळी सांगोला तालुक्याला सोडावे अशा सूचना राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ हनुमंत धुमाळ यांना दिले आहेत.

सांगोला तालुक्यातील शेतकरी पशुपालक आणि जनावरांना जीवनदान देण्यासाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचा पाठपुरावा सुरूच आहे. याबाबत त्यांनी मंगळवार दि. २८ जुलै रोजी राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांना मुंबई येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी पाणीप्रश्नाचे निवेदन दिले यावर पालकमंत्री गोरे यांनी तत्काळ कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ धुमाळ यांना याबाबतचे आदेश दिले आहेत.निम्म्याहून अधिक पावसाळा उलटला तरीही सांगोला तालुक्यात पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने तालुक्यातील शेतक-यांचा हक्काचा खरीप हंगाम वाया गेला आहे. खरीप हंगामात कोणतीही शेतीपिके आणि चारा न आलेले जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही तालुक्यात गंभीर होऊ लागला आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी आणि पशुपालक दोघेही चिंतेत आहेत तालुक्यातील सर्वच जलस्रोत तळाला गेल्याने पिण्याच्या पाण्याचे संकट तालुक्यावर ओढावणे आहे म्हणून पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी टेंभू उपसा सिंचन योजनेतून मानगंगा नदीत आणि लाभक्षेत्रातील तलावांत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे पाणी कोरडा नदीत आणि तहानलेले शेतकरी आणि जनावरांसाठी दिपकआबांचा पाठपुरावा सुरूच...! एकीकडे पावसाने पाठ फिरवल्यामुळे दारातील मुकी जनावरे चाऱ्यासाठी टाहो फोडत आहेत.

हक्काचा खरीप हंगाम वाया गेल्याने तालुक्यातील शेतकरीही चिंताग्रस्त झाला आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या आणि प्रश्नासाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी मात्र चांगलीच कंबर कसली आहे याबाबत त्यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लेखी निवेदन दिले, त्यानंतर सांगोला तहसील कार्यालयावर धडक देऊन प्रशासनालाही याबाबत पाणी सोडण्याची विनंती केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी थेट जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांनाही याबाबत निवेदन दिले त्यामुळे सांगोला तालुक्याला दुष्काळात पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लाभक्षेत्रातील तलावांत तसेच निरा उजवा कालव्याचे पाणी लाभक्षेत्राला सोडल्यास सांगोला तालुक्यातील शेतकरी, पशुपालक आणि लाखो पशुधनाला जीवदान मिळण्यास मदत होणार आहे. यासाठीच मंगळवारी माजी आमदार दिपकआबा यांनी पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांची भेट घेतली होती. यानंतर पालकमंत्री गोरे यांनी सांगोल्याच्या पाणी प्रश्नाची गंभीर दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना ताबडतोब तालुक्याला पाणी सोडण्याची सूचना केली.

स्व.आमदार डॉ.भाई गणपतरावजी देशमुख यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त आज विविध कार्यक्रम



सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्व. डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त आज गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित राहून स्व. भाई देशमुख यांच्या कार्याला अभिवादन करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्व. भाई देशमुख यांनी सहा दशकांहून अधिक काळ समाजकारण व लोकसेवेला वाहून घेतले. स्वाभिमान, निष्ठा आणि तत्त्वनिष्ठ राजकारणाचा आदर्श त्यांनी आयुष्यभर जपला. गोरगरीब, शेतकरी व वंचित घटकांच्या हक्कासाठी त्यांनी निःस्वार्थपणे कार्य करत सांगोला तालुक्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. पुण्यस्मरणानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. सागर महाराज बोराटे (नातेपुते) यांचे भजन–कीर्तन होणार असून, दुपारी १२.०५ वाजता पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी १२.१५ वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम स्व. आमदार डॉ. भाई गणपतरावजी देशमुख समाधी स्थळ, स्व. आमदार डॉ. भाई गणपतरावजी देशमुख सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोला येथे होणार आहे. कार्यक्रमास श्रीमती रतनबाई गणपतरावजी देशमुख, श्री. चंद्रकांत गणपतरावजी देशमुख, आमदार डॉ. बाबासाहेब पोपटराव देशमुख आणि डॉ. अनिकेत चंद्रकांत देशमुख यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटना, सांगोला यांच्या वतीने करण्यात आले असून, तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहून स्व. भाई देशमुख यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मुक्त विचार

विचारधन

द्वेष हा द्वेषाने कधीही संपत नाही, तो केवळ प्रेमानेच संपवता येतो.'' राग बाळगणे म्हणजे स्वतःच गरम कोळसा हातात धरून दुसऱ्यावर फेकण्यासारखे आहे, ज्यामुळे आधी आपलाच हात भाजतो.

-गौतम बुध्द

कथा पहिल्या गुरुपौर्णिमेची

योगिक संस्कृतीमध्ये शिवाकडे देवता म्हणून नव्हे, तर आदियोगी म्हणून पाहिले जाते. पंधरा हजार वर्षांहून अधिक काळापूर्वी एक योगी हिमालयातल्या उच्च प्रदेशांमध्ये अवतरला. त्याचे उगमस्थान किंवा त्याचा पूर्वेतिहास याविषयी कोणालाच कल्पना नव्हती. शिवाय, त्याने स्वतःची ओळखही करुन न दिल्याने त्याचे नावही अज्ञात राहिले. परिणामी त्याचा उल्लेख आदियोगी किंवा प्रथम योगी असा केला जातो.

गुरु पौर्णिमा म्हणजे प्रथम योगीने स्वतःचे रुपांतर आदिगुरु - पहिल्या गुरुमध्ये केले ती पौर्णिमा.

त्याचं आगमन झालं, तो आसनस्थ झाला तो शून्यावस्थेतच होता. त्याच्या नेत्रांतून वाहणारे परमानंदाचे अश्रू हीच जीवनाची एकमात्र निजखूण होती. याव्यतिरिक्त काहीच जाणवत नव्हतं, अगदी त्याचं श्वसन सुरू आहे की नाही, हेसुद्धा समजत नव्हतं. तो काही गूढ अनुभूती घेत असल्याचं तिथल्या लोकांना जाणवलं, ज्याची ते कल्पनाही करू शकत नव्हते. सारंच अगम्य होतं. ते लोक आले, काही वेळ त्यांनी वाट पाहिली आणि अखेरीस ते निघून गेले. कारण गूढ अनुभूतीत हरवलेल्या त्या योग्याला भोवतालाचे भान उरले नव्हते.

पण केवळ सात माणसे तेथे थांबून राहिली. या आदियोगीकडून ज्ञान ग्रहण करण्यासाठी ती सात माणसे आग्रही होती. पण आदियोगींनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्या सात जणांनी प्रार्थना केली, ''जे गुह्य ज्ञान आपल्याला प्राप्त झाले आहे, ते आम्हालाही प्राप्त करण्याची इच्छा आहे.'' त्यांची विनवणी धुडकावून लावत आदियोगी गरजले, ''मूढमतींनो, तुम्ही आज ज्या अवस्थेत आहात त्यावरून हे स्पष्ट होतं की लाखो वर्षांमध्येही तुम्हाला ज्ञानप्राप्ती अशक्य आहे. हे प्राप्त करण्यासाठी तुम्हाला कठोर तपस्या करण्याची आवश्यकता आहे. हा काही पोरखेळ किंवा मनोरंजन नव्हे.''

दक्षिणायनची पहिली पौणिमा म्हणजे गुरुपौर्णिमा, अर्थात प्रथम गुरु जन्मला तो दिवस.

पण त्या सात जणांचा अट्टाहास इतका तीव्र होता की, आदियोगीने त्यांना काही पूर्वतयारीचे टप्पे सांगितले. दिवसांमागून दिवस गेले, महिन्यांमागून महिने सरले, वर्षांमागून वर्षे गेली... तरीही या सात जणांची तपस्या सुरूच होती. आदियोगींनी मात्र त्यांच्याकडे पाहिलेसुद्धा नाही. असं म्हणतात की, सात जणांची साधना जवळपास ८४ वर्षे अखंड सुरू होती. ८४ वर्षांनंतर एका पौर्णिमेच्या दिवशी सूर्य जेव्हा उत्तरेकडून दक्षिणेकडे भ्रमण करता होता, त्या दक्षिणायनाच्या आरंभी आदियोगींची कृपादृष्टी त्या सात साधकांवर पडली. आता ते आत्मज्ञानप्राप्तीसाठी पात्र झाले होते. या पात्रतेच्या तेजाने ते तळपत होते. आता ते खरंच पात्र बनले होते. आदियोगी आता त्यांच्याकडे दुर्लक्ष करूच शकत नव्हते.

आदियोगीने त्या सातही जणांना जवळून न्याहाळले आणि जेव्हा आकाशात पूर्ण चंद्र दिसला, त्या वेळी त्याने गुरूच्या भूमिकेत जायचे ठरवले. ती पूर्ण चंद्राची पौर्णिमा 'गुरुपौर्णिमा' म्हणून ओळखली जाते. पहिल्या योग्याचे रूपांतर आदिगुरूत होण्याची पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा. तो आदिगुरू दक्षिण दिशेला वळला आणि त्याने आपल्या सप्त शिष्यांना योगशास्त्राचे ज्ञान दिले. म्हणूनच तो 'दक्षिणमूर्ती' म्हणून प्रसिद्ध आहे. हीच ती दक्षिणायनातील पहिली पौर्णिमा... हीच ती गुरुपौर्णिमा, ज्या पौर्णिमेला आदिगुरूचा म्हणजेच ब्रह्माण्डातल्या प्रथम गुरूचा जन्म जाहला.

गुरुपौर्णिमा - सर्व मर्यादा भेदण्याची शक्यताःज्ञान संक्रमित करण्याचा हा 'विश्वातला पहिला योग-कार्यक्रम' कुठे संपन्न झाला बरं? केदारनाथपासून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या कांतिसरोवराच्या काठी! जेव्हा आपण ''योग'' असं म्हणतो, ते काही शरीर वेडेवाकडे पिळणे किंवा श्वास रोखून ठेवण्याच्या क्रियांबद्दल बोलत नाही आहोत. पण सध्या आपण चर्चा करत आहोत ती जीवनाच्या मूलभूत प्रक्रियेविषयी आणि तुम्ही, जी या सृष्टीची एक रचना आहात, तिला तिच्या सर्वोच्च संभावनेत प्रस्थापित करण्याविषयी. मानवी चेतनेचा हा अभूतपूर्व आयाम किंवा सीमित मनुष्याला 'असीम' आणि 'वैश्विक' बनवणारं गवाक्ष उघडलं ते गुरुपौर्णिमेलाच!

गुरुपौर्णिमा ही मानवजातीच्या इतिहासातील सर्वोच्च क्षणांना अधोरेखित करते. आजवर मानव ज्यापासून अनभिज्ञ होता, त्या श्रेष्ठत्वाच्या आणि मुक्तीच्या शक्यतेला ती प्रकाशात आणते.गुरुपौर्णिमा ही मानवजातीच्या इतिहासातील सर्वोच्च क्षणांना अधोरेखित करते. आजवर मानव ज्यापासून अनभिज्ञ होता, त्या श्रेष्ठत्वाच्या आणि मुक्तीच्या शक्यतेला ती प्रकाशात आणते. तुमचा जन्म कोणत्या वंशात झाला, तुमचा जन्मदाता कोण आहे किंवा जन्मतःच अथवा नंतर तुमच्यात कोणत्या कमतरता किंवा दोष आहेत यांनी काहीच फरक पडत नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तुमची तयारी असेल, तर तुम्ही अलौकिक झेप घेऊ शकता. मानवजातीच्या इतिहासात मानवाला हे प्रथमच आकळलं आणि त्यानं घोषित केलं की, सजगतापूर्वक उत्क्रान्त आणि उन्नत होणं शक्य आहे.हजारो वर्षे, मानव जातीसाठी नवनवीन शक्यता उपलब्ध करून देणारा दिवस म्हणून गुरु पौर्णिमा ओळखली जाते व साजरी केली जाते. आदियोगीने जे योगविज्ञान मानवजातील उपलब्ध करून दिलं ते कोणत्याही धर्माच्या आरंभा आधीचे आहे. लोकांनी मानवतेला परस्परविरोधी अनेक छोट्या छोट्या गटांमध्ये विभागण्याचे मार्ग शोधण्याआधी, जे आज दुरुस्त करणे दुरापास्त होऊन गेले आहे, आदियोगीने मानवी चेतना वाढविण्यासाठी आवश्यक असणार्या शक्तीशाली साधने निर्माण करून त्यांचा अभ्यास आणि प्रसार देखील सर्वत्र केला. हजारो वर्षांपूर्वी, आदियोगीने मानवी यंत्रणेचे रुपांतर अदभूत शक्यतांमध्ये करण्यासाठी, शक्य असणारे सर्व मार्ग शोधून काढले.

गुरुपौर्णिमा : बुद्धाचा प्रकाश, बाबासाहेबांचा विचार आणि बुद्धीची वाट!

गुरुपौर्णिमा म्हटली की डोळ्यांसमोर येतो तो गुरूचा चेहरा, त्याच्या चरणी ठेवलेली श्रद्धा आणि त्याने दिलेल्या ज्ञानाबद्दल व्यक्त केली जाणारी कृतज्ञता. पण आजच्या काळात गुरुपौर्णिमेचा अर्थ केवळ गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यात नाही, तर गुरूंनी दिलेल्या विचारांच्या प्रकाशात स्वतःचे जीवन तपासण्यात आहे. गुरू तोच, जो अंधानुकरण शिकवत नाही तर जो प्रश्न विचारायला शिकवतो. गुरू तोच, जो शिष्याला स्वतःच्या पायावर उभे करतो, जो आयुष्यभर स्वतःच्या चरणी डोके ठेवायला भाग पाडत नाही आणि म्हणूनच गुरुपौर्णिमेच्या या पवित्र पर्वावर तथागत गौतम बुद्ध आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ दोन महामानवांना अभिवादन करणे नव्हे, तर विवेक, समता, स्वातंत्र्य आणि माणुसकीच्या विचारांना पुन्हा एकदा जागवणे होय. तथागत गौतम बुद्धांनी जगाला दिलेला सर्वात मोठा संदेश कोणता असेल, तर तो आहे स्वतः विचार करा, सत्याची चिकित्सा करा आणि जे तर्काला पटते, अनुभवाला येते आणि मानवकल्याणाला पोषक ठरते तेच स्वीकारा. बुद्धांनी माणसाला अंधश्रद्धेच्या अंधारातून प्रज्ञेच्या प्रकाशाकडे नेले. त्यांनी प्रश्न विचारणाऱ्या मनाला पापी ठरवले नाही, उलट प्रश्न विचारणे हीच ज्ञानाची सुरुवात आहे, असे जगण्याचा संदेश दिला. दुःखाचे कारण शोधताना त्यांनी स्वर्गाच्या कल्पनेपेक्षा पृथ्वीवरील माणसाच्या दुःखाकडे पाहिले. त्यांनी कर्मकांडापेक्षा करुणेला, जातिभेदापेक्षा समतेला आणि अंधश्रद्धेपेक्षा प्रज्ञेला महत्त्व दिले.

म्हणूनच बुद्ध हे केवळ धर्माचे प्रवर्तक नाहीत तर ते मानवी बुद्धीला मुक्त करणारे महान गुरू आहेत. त्यांनी माणसाला सांगितले की, कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका. कोणी सांगितली म्हणून सत्य मानू नका. स्वतः तपासा, स्वतः विचार करा आणि मग निर्णय घ्या. आजच्या माहितीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हा बुद्धांचा संदेश अधिकच महत्त्वाचा आहे. कारण आज अज्ञानाचा अभाव नाही, पण विवेकाचा अभाव आहे. माहितीच्या महासागरात सत्य शोधण्याची क्षमता हरवत चालली आहे. सोशल मीडियावरील प्रत्येक संदेश खरा मानला जातो आणि अफवांना तथ्याचे रूप दिले जाते. अशा काळात बुद्धांचा 'प्रज्ञेचा मार्ग' समाजाला वाचवू शकतो. याच बुद्धांच्या विचारांचा आधुनिक भारताच्या सामाजिक आणि घटनात्मक जीवनाशी सशक्त संबंध जोडणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांनी बुद्धांना केवळ गुरू मानले नाही, तर त्यांच्या विचारांना आधुनिक सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र बनवले. हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेने माणसाला माणसापासून तोडले होते. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेने समाजाची मने गुलाम केली होती. अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग दाखवला. त्यांनी सांगितले की, माणसाची किंमत त्याच्या जन्माने नाही, तर त्याच्या कर्तृत्वाने ठरली पाहिजे.

आज आपण गुरुपौर्णिमा साजरी करतो, पण आपल्या समाजात गुरूंचे विचार किती जिवंत आहेत? विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यापासून रोखले जाते, संशय व्यक्त करणाऱ्याला धर्मद्रोही ठरवले जाते, वैज्ञानिक दृष्टिकोन मांडणाऱ्याची खिल्ली उडवली जाते आणि अंधश्रद्धेला विरोध करणाऱ्यांना शत्रू मानले जाते. ही परिस्थिती बदलायची असेल तर शाळांपासून घरापर्यंत आणि समाजापासून राजकारणापर्यंत विवेकाचे शिक्षण द्यावे लागेल. गुरू म्हणजे शिष्याला स्वतःच्या विचारांची कैद करून ठेवणारा नव्हे, तर त्याला स्वतंत्र विचार करण्याची ताकद देणारा. बुद्धांनी माणसाला स्वतःच्या प्रकाशाचा शोध घ्यायला शिकवले. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांना आत्मभान दिले. या दोन्ही महामानवांच्या विचारांचा केंद्रबिंदू एकच होता. माणसाला मुक्त करा! अज्ञानातून मुक्त करा, भीतीतून मुक्त करा, जातिभेदातून मुक्त करा, अंधश्रद्धेतून मुक्त करा आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त करा. आजच्या गुरुपौर्णिमेला म्हणूनच आपल्याला एका नव्या गुरुदक्षिणेची गरज आहे. ती गुरुदक्षिणा म्हणजे बुद्धाचा विवेक आपल्या विचारांत आणणे, बाबासाहेबांचा समतेचा विचार आपल्या आचरणात आणणे आणि बुद्धीला अंधश्रद्धेपेक्षा मोठे स्थान देणे. जात, धर्म, पंथ, भाषा आणि आर्थिक विषमता यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक माणसाला माणूस म्हणून सन्मान देणे. संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांचे संरक्षण करणे. हीच बुद्धाला खरी वंदना आणि बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल.

गुरुपौर्णिमा ही केवळ गुरूंच्या चरणी माथा टेकण्याची परंपरा राहू नये. ती आपल्या विवेकाला जागवण्याची चळवळ बनली पाहिजे. कारण ज्या समाजात प्रश्न विचारणारे नागरिक असतात, तिथे लोकशाही जिवंत राहते. ज्या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन असतो, तिथे अंधश्रद्धेला थारा मिळत नाही. ज्या समाजात समता असते, तिथे माणूस माणसाचा शत्रू होत नाही. आणि ज्या समाजात बुद्धाचा करुणामय विवेक आणि बाबासाहेबांचा समतावादी विचार जिवंत असतो, तो समाज खऱ्या अर्थाने प्रगतिशील होतो. आज गुरुपौर्णिमेच्या दिवशी तथागत गौतम बुद्धांच्या प्रज्ञेला, करुणेला आणि मानवतावादी विचारांना विनम्र अभिवादन करूया. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानक्रांतीला आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नमन करूया. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा केवळ जयघोषात न ठेवता आपल्या जीवनात उतरवण्याची प्रतिज्ञा करूया. बुद्धाचा प्रकाश आपल्या विचारांना दिशा देवो, बाबासाहेबांचा विचार आपल्या संघर्षाला शक्ती देवो आणि बुद्धीचा विवेक आपल्या समाजाला अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर काढो!

गुरूंच्या चरणी फुले अर्पण करण्यापेक्षा त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे मोठे आहे. बुद्धांना वंदन करण्यापेक्षा त्यांच्या प्रज्ञेचा स्वीकार करणे मोठे आहे. बाबासाहेबांना अभिवादन करण्यापेक्षा त्यांच्या संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे मोठे आहे. हीच खरी गुरुदक्षिणा! हीच खरी गुरुपौर्णिमा! आणि हाच खऱ्या अर्थाने बुद्धीसमाजाचा मार्ग! गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त आपल्या जीवनाला प्रज्ञा, विवेक, समता आणि माणुसकीची दिशा देणाऱ्या तथागत गौतम बुद्धांना आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोटी कोटी नमन! आपणास व आपल्या परिवारास गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

-प्रविण बागडे,नागपूर

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३९ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

डॉ. गणपतराव देशमुख लोकनेतृत्वाचा अर्धशतकाहून अधिक काळ उजळवणारा प्रवास



महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात काही व्यक्तिमत्व असे आहेत की ज्यांचे नाव घेताच प्रामाणिकपणा साधेपणा जनसेवा आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेला संघर्ष डोळ्यासमोर उभा राहतो अशाच व्यक्तिमत्वा पैकी एक म्हणजे डॉ गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख.

सुमारे सहा दशकावून अधिक काळ त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून कार्य केले महाराष्ट्र विधानसभेत तब्बल ११ वेळा निवडून जाण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी दुष्काळ, पाणीटंचाई, शेती, रोजगार, शिक्षण सहकार आणि ग्रामीण विकास यासारख्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या भाषणामध्ये अभ्यास अनुभव आणि जनतेबद्दलची खरी तळमळ दिसून येत असे. डॉक्टर गणपतराव देशमुख हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते होते पक्षनिष्ठा तत्त्वनिष्ठ आणि स्वच्छ राजकारण यांची त्यांनी आयुष्यभर जपणूक केली अनेकदा मोठ्या पक्षाकडून आकर्षक राजकीय संधी मिळूनही त्यांनी आपल्या विचाराची तडजोड केली नाही हीच त्यांची खरी ओळख ठरली. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची साधी राहणे, अनेक वर्ष आमदार राहूनही त्यांनी सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगले त्यांच्या घराचे दरवाजे सर्वसामान्य नागरिकासाठी नेहमी खुले असत. कोणताही नागरिक कोणत्याही वेळी त्यांना भेटू शकत असे त्यामुळे लोक त्यांना प्रेमाने आबासाहेब म्हणून संबोधत.

डॉ गणपतराव देशमुख यांचा जन्म १० ऑगस्ट १९२७ रोजी महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात झाला. ग्रामीण वातावरणात त्यांचे बालपण गेले त्या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता आणि दुष्काळ पाण्याची कमतरता व आर्थिक अडचणी हे ग्रामीण जीवनाचे वास्तव होते. या परिस्थितीचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची आवड होती. कष्ट, शिस्त, प्रामाणिकपणा हे संस्कार त्यांना घरातून मिळाले. शेतकरी कुटुंबातील जीवनामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी जवळून अनुभवल्या, पुढे याच अनुभवामुळे त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी आणि ग्रामीण विकासाला बनवले. शालेय जीवनातच त्यांच्यात नेतृत्व गुण दिसून येत होते. सामाजिक प्रश्नाबद्दल त्याना विशेष आस्था होती स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण आणि समाज सुधारकांच्या विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला. लोकहितासाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना याच काळात मिळाली. ग्रामीण भागातील गरिबी, अशिक्षितपणा, दुष्काळ आणि बेरोजगारी यांचे त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतले. त्यामुळे पुढे लोकप्रतिनिधी झाल्यानंतर त्यांनी विकासाच्या प्रत्येक योजनेत ग्रामीण भागाला प्राधान्य दिले. आबासाहेबांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ग्रामीण वातावरणात झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांना समाजातील विषमता गरिबी शेतकऱ्यांच्या अडचणी आणि ग्रामीण भागातील विकासाचा अभाव यांची प्रकर्षाने जाणीव झाली. विद्यार्थी अवस्थेतच त्यांनी सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. वाचनाची आवड आणि लोकांशी संवाद साधण्याची सवय यामुळे त्यांची विचारसरणी अधिक व्यापक होत गेली. आबासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात शेतकरी कामगार पक्ष या पक्षातून केली. शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवणारा हा पक्ष त्यांच्या विचारांशी सुसंगत होता. शेकाप चे ज्येष्ठ नेते आणि समाजवादी विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांनी पक्षात संघटनात्मक काम करत गावोगावी संपर्क वाढवला. शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या हक्कासाठी संघर्ष करण्याचा निर्धार केला. त्यांनी पक्षनिष्ठ ला आयुष्यभर महत्त्व समजून घेतल्या सातत्याने पाठपुरावा, भ्रष्टाचारापासून दूर दिले. अनेक वेळा मोठ्या राजकीय पक्षाकडून त्यांना आमंत्रण मिळाले, परंतु त्यांनी आपल्या तत्त्वाशी तोडजोड केली नाही. त्यामुळे ते तत्त्वनिष्ठ राजकारणाचे प्रतीक बनले. आबासाहेबांनी सुरुवातीपासूनच जनतेच्या प्रश्नावर काम करण्यास प्राधान्य दिले. त्यांनी दुष्काळ, पाणीटंचाई, शेती, शिक्षण, रस्ते, वीज आणि आरोग्य यासारख्या प्रश्नावर लोकांना संघटित केले. त्यांच्या प्रामाणिक कार्यामुळे सांगोला परिसरातील नागरिकांचा त्यांच्यावर मोठा विश्वास बसला. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या दिखाव राजकारणापेक्षा प्रत्यक्ष लोकांमध्ये राहून काम करण्याची पद्धत स्वीकारली. त्यामुळे ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले.

डॉ. गणपतराव देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघातून पहिली निवडणूक लढवली. त्या काळात काँग्रेसचे वर्चस्व असतानाही त्यांनी आपला साधेपणा प्रामाणिकपणा आणि जनसंपर्काच्या बळावर विजय मिळवला. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नव्हता तो ग्रामीण जनतेचा विश्वासाचा विजय होता. या निवडणुकीपासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास पुढील अनेक दशकापर्यंत अखंड सुरू राहिला. या पहिल्या कार्यकाळातच आबासाहेबांनी मतदारसंघात सातत्याने दौरे केले. प्रत्येक गावातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या, शासनाकडे पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावले. लोकांना सहज उपलब्ध असणारा आमदार, आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामावरभर, विरोधी पक्षात असतानाही विकास कामासाठी राहून स्वच्छ प्रतिमा जपणे, जनतेचा पैशाचा काटेकोर वापर करण्यावर भर याच गुणामुळे सांगोला मतदारसंघात त्यांच्याविषयी अपार विश्वास निर्माण झाला. आणि पुढील अनेक निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना पुन्हा पुन्हा विधानसभेत पाठवले. तब्बल ११ वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून येण्याचा मान मिळवला हा विक्रम महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील महत्त्वाच्या टप्प्यापैकी एक मानला जातो. त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री बदलले, अनेक सरकारे आली, गेली राजकीय समीकरणे बदलली. परंतु आबासाहेबांची तत्त्वनिष्ठा, साधेपणा आणि जनते प्रती असलेली बांधिलकी कायम राहिली. आबासाहेब विधानसभेत अभ्यासू आमदार म्हणून ओळखले जात असत. कोणत्याही विषयावर बोलण्यापूर्वी ते सखोल अभ्यास करत त्यांच्या भाषणामध्ये तथ्य, आकडेवारी आणि प्रत्यक्ष अनुभव याचा आधार असे. शेतकऱ्यांना हमीभाव, दुष्काळ निवारण, सिंचन प्रकल्प, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रामीण रस्ते, शिक्षण आणि आरोग्य, सहकार चळवळ, रोजगार निर्मिती या विषयावर सातत्याने आवाज उठवल्यामुळे सत्ताधारी यांना अनेकदा निर्णय घ्यावे लागत. आबासाहेब नेहमी म्हणत असत ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय महाराष्ट्राचा विकास पूर्ण होणार नाही. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न कधीही केवळ निवडणुकीपुरते मर्यादित ठेवले नाहीत. त्यांनी शेतीमालाला योग्य भाव, कर्ज सवलती, सिंचन, वीज, बियाणे आणि खताच्या उपलब्धतेसाठी सातत्याने आवाज उठवला.

आबासाहेब विरोधी पक्षात असले तरी त्यांच्या कामाची दखल सर्व पक्षाचे नेते घेत असत. सभागृहातील त्यांची भाषणे शांत संयमी आणि मुद्देसूद असत त्यांनी कधीही वैयक्तिक टीका टिप्पणी केली नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा अभ्यास वृत्ती आणि साधेपणामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर मिळाला. अनेक तरुण लोकप्रतिनिधींनी त्यांना आदर्श मानले. त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जनतेचा विश्वास. निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत आणि म्हणूनच सांगोला मतदार संघातील नागरिकांनी अनेक दशकापर्यंत त्यांच्यावर विश्वास कायम ठेवला. प्रशासकीय निर्णय घोताना त्यांनी पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि लोकहित या तत्त्वाचा अवलंब केला. अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी समन्वय साधून कामे वेळेत पूर्ण करण्यावर त्यांचा भर असे. आबासाहेब यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा साधेपणा अनेक दशके आमदार आणि मंत्री राहूनही त्यांनी कधी सत्तेचा दिखाऊपणा केला नाही. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी वयोमानाचा विचार करून त्यांनी निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांनी स्वतः जाहीर केला आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळावी अशी भूमिका मांडली. सक्रिय निवडणूक राजकारणातून बाजूला झाल्यानंतर ते सामाजिक आणि सार्वजनिक प्रश्नावर मार्गदर्शन करत राहिले. ३० जुलै २०२१ रोजी आबासाहेब यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. यावेळी सर्वांनी त्यांचे वर्णन स्वच्छ प्रतिमेचे अभ्यासू तत्वनिष्ठ आणि लोकाभिमुख नेते असे केले. सांगोला तालुक्याच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य, शेतकयांच्या प्रश्नावर घेतलेली ठाम भूमिका आणि स्वच्छ राजकारणाचा त्यांनी घालून दिलेला आदर्श पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात त्यांचे नाव लोकनेते आबासाहेब गणपतराव देशमुख म्हणून सदैव आदराने घेतले जाईल.

-प्रा. नितिन लोले,न्यू इंग्लिश स्कूल, ज्युनिअर कॉलेज,सांगोला

महूद परिसरात चोऱ्या, दरोडे, हाणामाऱ्या, खून, सततची वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर घटनांमध्ये वाढ

स्वतंत्र पोलीस ठाण्याची ग्रामस्थांची जोरदार मागणी

सांगोला : सांगोला तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचे केंद्र असलेल्या महूद परिसरात चोऱ्या, दरोडे, हाणामाऱ्या, खून आणि सततची वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. वाढत्या गुन्हेगारीवर चाप बसावा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी महूद येथे स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर करावे, अशी ठाम मागणी महूदसह परिसरातील २३ गावांतील ग्रामस्थ, व्यापारी आणि शेतकरी यांच्याकडून केली जात आहे.

महूद हे जत-मुंबई राष्ट्रीय महामार्ग आणि पंढरपूर-मल्हारपेठ राज्य महामार्गाच्या मुख्य चौकात वसलेले गाव आहे. परिसरातील २३ लहान-मोठी गावे आणि वाड्या-वस्त्यांचा दैनंदिन संपर्क महूदशी येतो. ढोबळी मिरची, काकडी, खरबूज, डाळिंब व उसाचे मोठे उत्पादन येथे होते. शेतीमाल परराज्यात पाठवला जात असल्याने व्यापारी, कामगार व ऊसतोड मजुरांचा येथे मोठा वावर असतो. अनेक बँक, पतसंस्था, शाळाकॉलेज आणि शासकीय कार्यालये येथे कार्यरत आहेत. कोकण, सातारा, सांगली येथून पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो भाविकांचा हाच मुख्य मार्ग आहे. या सर्व कारणांमुळे महूद परिसर नेहमी गजबजलेला असतो.

वाळू माफिया अन् परजिल्ह्यातील चोरांच्या टोळ्या सक्रिय राष्ट्रीय जल पुरस्कार विजेत्या कासाळ उपनदीसह माण नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत वाळू उपसा सुरू असून, त्यामुळे महसूल बुडण्यासोबतच वाळू माफियांची दहशत महूद परिसरात वाढली आहे. महूद हे तालुक्याच्या टोकावर असल्याने शेजारच्या सांगली, सातारा व इतर राज्यातील चोरांच्या टोळ्या येथे सक्रिय असल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जाते. स्वतंत्र पोलीस ठाणे झाल्यास या आंतरजिल्हा गुन्हेगारीला वेसण घालता येईल. नागरीकरणाचा फायदा घेत गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. सध्या महूद येथे केवळ 'पोलीस दूरक्षेत्र' आहे. मात्र, येथे कार्यरत कांही कर्मचारी सांगोला, पंढरपूर येथून ये-जा करतात; ते स्थानिक पातळीवर वास्तव्यास नसतात. परिणामी, रात्री-अपरात्री एखादी गंभीर घटना घडल्यास पोलिसांची मदत वेळेवर मिळत नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी पोलीस येईपर्यंत ग्रामस्थांना ताटकळत राहावे लागते.

पोलिसांच्या याच गैरसोयीचा फायदा चोर आणि गुन्हेगार घेत असून, परिसरात गुन्हेगारीची भीती पसरली आहे. शासनाची पुरेशी जागा उपलब्ध असल्याने येथे स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्यात कोणतीही अडचण नाही.

सांगोल्यातील जनावरांच्या बाजारात हरयाणा जातीच्या म्हशीला तब्बल ४ लाख १ हजार इतक्यात विक्री

सांगोला : सांगोला येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जनावरांच्या बाजारात हरयाणा जातीच्या एका उच्च प्रतीच्या म्हशीची तब्बल ४ लाख १ हजार इतक्या विक्रमी किमतीत विक्री झाल्याने हा व्यवहार राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे.

या विक्रीचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून पशुपालक आणि व्यापाऱ्यांमध्ये त्याची जोरदार चर्चा सुरू आहे. सांगोला येथील मेटकरी वस्तीतील प्रगत पशुपालक सुनील सुरेश मेटकरी यांनी ही म्हैस विक्रीसाठी बाजारात आणली होती. उत्कृष्ट बांधा, उत्तम आरोग्य आणि भरघोस दूध उत्पादनामुळे अनेक व्यापारी व पशुपालकांनी तिची पाहणी केली. ही म्हैस दिवसाला जवळपास सरासरी २५ लिटर दूध देणारी असल्याचे सांगण्यात आले. अखेर हैदराबाद येथील व्यापाऱ्यांने ही म्हैस ४ लाख १ हजार किमतीत खरेदी केली. व्यवहार पूर्ण होताच बाजारात गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर चारचाकी वाहनातून ही म्हैस हैदराबादकडे रवाना करण्यात आली.

सांगोला येथील जनावरांचा बाजार हा राज्यातील प्रमुख बाजारांपैकी एक मानला जातो. येथे उच्च प्रतीच्या दुभत्या जनावरांना नेहमीच चांगला भाव मिळत असल्याचे या व्यवहारातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पशुपालकांना दर्जेदार जनावरांच्या संगोपनासाठी प्रोत्साहन मिळत असून, या विक्रमी व्यवहाराची राज्यभर चर्चा रंगली आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

पाचवे
पुण्यस्मरण
महाराष्ट्राच्या राजकारणातील
भिष्मपितामह.
स्व.मा.डॉ.
गणपतरावजी
देशमुख
गुरूवार दि.30/07/2026 रोजी
श्रध्देची अन निष्टेची
तुम्ही गुंफली फुले प्रतिष्ठा
आम्हास लाभेकेवळ तुमच्यामुळे
कष्टातून तुम्ही उभा केला,
हा सर्व पसारा उद्योगाच्या
नभात वाटे झाला उज्वल तारा ...
अभिवादक:-
मा. श्री. मारुती (आबा)तुळशीराम बनकर.
मा. श्री. बाळासाहेब महादेव एरंडे व मित्रपरिवार सांगोला.
काका डिजिटल -9765460101